महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
Website : www.mahadiscom.in

क्र. मासंवि/रवका /न.क्र. ५/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : agmhrom@gmail.com

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८९ दिनांक १६ / ०९ / २०१९

**विषय : सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारीत आरक्षण व कार्यपध्दती अंगीकृत करण्याबाबत.**

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८० दि. २१.०१.२०१९
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८३ दि. १६.०३.२०१९

आरक्षण कायदा-२००४ नुसार मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणांच्या आदेशाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावर वेळोवेळी शासन निर्णय परिपत्रकान्वये सूचना/तरतुदी निर्गमित केल्या आहेत.

२. महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२, दि. ३० नोव्हेंबर, २०१८ (सन २०१८) अनुसार महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२) अन्वये "सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग" निर्माण करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/ प्र.क्र.५८१ ए/२०१८/१६-ब दि. ०५.१२.२०१८ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता १६% आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी विहीत केलेली बिंदुनामावली, कंपनीने अंगीकृत केली होती.

३. परंतु, शासन निर्णय व उक्त अधिनियमाच्या विधिग्राहयतेला मा. उच्च न्यायालय मुंबई येथे जनहित याचिका क्र. १७५/२०१८ अन्वये आव्हान देण्यात आले होते. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २७.०६.२०१९ उक्त प्रकरणातील न्यायनिर्णय दिला आहे, त्याव्दारे उक्त अधिनियमाच्या उक्त तरतूदींव्दारे विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या प्रमाणाची मर्यादा वगळून उक्त अधिनियमाची विधिग्राहयता कायम ठेवण्यात आली आहे.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी, पूर्वी तरतूद करण्यात आलेले १६% आरक्षण रद्दबातल करून, सामाजिक व शैक्षणिक मागास वर्गाकरीता सरळसेवा प्रवेशांमध्ये एकूण १३% (तेरा टक्के) आरक्षण निश्चीत केले आहे. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ए/१६-ब दि. ०४.०७.२०१९ अन्वये सरळसेवा प्रवेशाकरीता सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता १३% आरक्षणाची तरतूद करून, सुधारीत बिंदुनामावली विहीत केलेली आहे.

५. आता, संचालक मंडळ यांनी ठराव क्र. १८३७ दि. ०३.०८.२०१९ अन्वये कंपनीमध्ये सरळसेवा प्रवेशासाठी सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर १३% पदे राखीव ठेवण्याकरीता मंजुरी प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५ शी संलग्न परिशिष्ट क मध्ये सुधारपत्र क्र. ८२ दि. १६.०९.२०१९ नुसार योग्य ते बदल करण्यात आलेले आहेत.

६.	सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्ग व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता सरळसेवा प्रवेशासाठी आणि बिंदूनामावलीच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/ प्र.क्र.५८१ए/२०१८/१६-ब दि. ०५.१२.२०१८ *(एसईबीसी)*, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/ प्र.क्र.५८१ए/ २०१८/१६-ब दि. १९.१२.२०१८*(एसईबीसी)*, शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि. १२.०२.२०१९ *(ईडब्ल्यूएस)*, शासन पत्र बीसीसी-२०१८/प्र.क्र.६३१A/१६ब दि. ०४.०७.२०१९*(एसईबीसी)* आणि शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ए/१६-ब दि. ०४.०७.२०१९ *(एसईबीसी)* व सोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" नुसार सरळसेवा भरतीबाबत सुधारीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. उपरोक्त शासन निर्णय व पत्राची छायाप्रत माहितीस्तव सोबत जोडण्यात येत आहेत.

७.	सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गासाठीचे आरक्षण तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठीच्या आरक्षणाबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले अनुक्रमे प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८० दि. २१.०१.२०१९ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८३ दि. १६.०३.२०१९ याव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

८.	सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या Employee Portal/ e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

E:\Adm Cir 589 draft.docx

**सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८ /१६-ब**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०५ डिसेंबर, २०१८.

वाचा:-

१. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८.
२. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, दिनांक २२ जानेवारी, २००४, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती , विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ **(सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२)** अन्वये **"सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग"** निर्माण करण्यात आला आहे,

उक्त अधिनियमातील कलम ४ (१) (ख) नुसार **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्गासाठी १६ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. त्यास अनुसरून, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी १०९७/ प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात उक्त अधिनियमातील कलम ७ (१) नुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यात **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्गासाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम १५(४), १५(५), १६(४) व ४६ नुसार **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्ग (एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) असा नवीन वर्ग तयार करण्यात आला असून या वर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्ग (एसईबीसी.) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) वर्गासाठी, राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय /

निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात येत आहे. त्यानुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९.३.१९९७ अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारित करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ येथील, अधिनियम प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, म्हणजेच दि. ३० नोव्हेंबर २०१८ या दिनांकापासून शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसंदर्भात सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

३. **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्गासाठी (एसईबीसी) संदर्भाधीन क्रमांक १ येथील अधिनियमातील कलम ५ अनुसार गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांची संबंधित वर्गाच्या आरक्षित पदावर गणना करण्यात येऊ नये. त्यांची नियुक्ती संबंधित आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्यांची नोंद खुल्या प्रवर्गातील बिंदुवर दर्शविण्यात यावी.

४. **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्गासाठी (एसईबीसी) सरळसेवेने भरण्यात येणारी १६ टक्के आरक्षणाची पदे दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोटयातील संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षांकरिता सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) या वर्गाकरीता आरक्षणाची गणना करतांना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब व क** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

५. **संदर्भ क्र. १ येथील सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२ मधील कलम १६ (१) नुसार,** या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया सुरू झाली असेल, अशा प्रकरणांना या अध्यादेशाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम,२००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. यापुढे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सरळसेवा भरतीसाठी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करावा. पूर्वीपासून आरक्षण लागू असलेल्या मागासप्रवर्गांचा अनुशेष असल्यास तो सरळसेवा भरतीच्यावेळी विचारात घेण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,

शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्त्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

८. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत, वरील प्रमाणे बिंदुनामावलीचा अवलंब करताना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब व क** मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

९. हे आदेश दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ पासून अंमलात येतील.

१०. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८१२०५१६१५१७०९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHIVAJI RAGHUNATH DAUND

Digitally signed by SHIVAJI RAGHUNATH DAUND
DN: CN = SHIVAJI RAGHUNATH DAUND, C = IN, S = MAHARASHTRA, O = Personal
Date: 2018.12.05 16:22:04 +05'30'

**( शिवाजी दौंड )**
**सचिव (साविस), महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) राज्यपाल यांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५) मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१६) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७) प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१९) सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२०) सचिव,राज्य माहिती आयोग,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८) संचालक, सेवायोजन, मुंबई,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३४) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३६) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३७) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

## परिशिष्ट - अ
## सरळसेवा १०० बिंदूनामावली

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ७० | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | खुला | ७२ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ४० | खुला | ७४ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | खुला | ४२ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ७६ | खुला |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | खुला | ४४ | खुला | ७८ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | खुला | ८० | खुला |
| १३ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | खुला | ४८ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ८२ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | खुला | ५० | खुला | ८४ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ५२ | खुला | ८६ | खुला |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | खुला | ५४ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ८८ | खुला |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | खुला | ५६ | खुला | ९० | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ५८ | खुला | ९२ | खुला |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | खुला | ६० | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ९४ | खुला |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | खुला | ६२ | खुला | ९६ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ६४ | खुला | ९८ | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | खुला | ६६ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | १०० | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | खुला | ६८ | खुला | | |

## प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

| अनुक्रमांक | प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | बिंदु क्रमांक | |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३ % | १, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७ | |
| २ | अनुसूचित जमाती | ७ % | २, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३ | |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३% | ३, ४१, ८३, | |
| ४ | भटक्या जमाती (ब) | २.५% | ४, ४७ | ९९(ब/क) |
| ५ | भटक्या जमाती (क) | ३.५% | ७, ३१, ५७, | |
| ६ | भटक्या जमाती (ड) | २% | ११, ७७ | |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | २% | १५, ८७ | |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | १९% | ५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५ | |
| ९ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | १६% | ६, १३, १८, २४, ३०, ३६, ४२, ४८, ५४, ६०, ६६, ७२, ७८, ८४, ९०, ९६ | |
| ११ | खुला | ३२% | ८,१०, १४, १६,२०, २२, २६, २८, ३२, ३४, ३८,४०, ४४, ४६, ५०, ५२, ५६,५८, ६२, ६४, ६८, ७०, ७४, ७६,८०, ८२, ८६, ८८,९२, ९४,९८, १०० | |

## परिशिष्ट - ब

## बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना.

१) सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सन २०१८चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२ मधील तरतुदींस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

२) बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार संवर्गाच्या एकूण मंजूर पदसंख्येपैकी सरळसेवा कोट्यातील पदांची संख्या निश्चित करण्यात यावी.

३) दिनांक ३० नोव्हेंबर,२०१८ रोजी भरती प्रक्रिया सुरु न झालेल्या संवर्ग निहाय सरळसेवेच्या रिक्त पदांची संख्या निश्चित करावी.

४) भरती वर्ष-१ (दि. ०१ डिसेंबर, २०१८ ते दि. ३१ डिसेंबर,२०१९ ) या भरतीवर्षातील सरळसेवेच्या संभाव्य रिक्त पदांची संख्या निश्चित करावी.

अ) वरील प्रमाणे अ.क्र.२,३,४ नुसार एकूण प्रवर्ग निहाय सरळसेवेच्या रिक्त होणा-या पदांची खालील प्रमाणे आरक्षण निश्चिती करावी. ही आरक्षण निश्चित करताना दि. ३० नोव्हेंबर ,२०१८ रोजी संवर्गातील सरळसेवा कोट्यातील एकूण मंजूर पदसंख्येला (अ.जा.-१३ %, अ.ज.७%, विजा-अ ३%, भ.ज.(ब)-२.५%, भ.ज.(क)-३.५%, भ.ज.(ड)-२%, विमाप्र-२% व इमाव-१९%) एकूण ५२ टक्के आरक्षण विचारात घेऊन आरक्षित पदांची गणना करावी.

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | | | | | | | | | | |
| २ | भरलेली पदे | | | | | | | | | | |
| ३ | दि.३०.११.२०१८ रोजीची रिक्त पदे | | | | | | | | | | |
| ४. | दि.०१.१२.२०१८ ते ३१.१२.२०१९ या कालावधीतील संभाव्य रिक्त पदे | | | | | | | | | | |
| ५. | एकूण रिक्त पदे | | | | | | | | | | |

आ) दि.३० नोव्हेंबर ,२०१८ रोजी वरील आरक्षणानुसार प्रवर्ग निहाय मागास प्रवर्गाची व खुल्या प्रवर्गाची किती पदे कार्यरत आहेत, याची गणना करावी.

इ) दि. ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत संभाव्य रिक्त होणा-या पदांची संख्या विचारात घेऊन त्यावर नव्याने आरक्षण लागू केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गासाठी १६% आरक्षणाची गणना करावी.

परिशिष्ट-क

उदा. एखाद्या संवर्गात मंजूर पदसंख्या १०० आहे. दि.३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत या संवर्गात ६७ पदे कार्यरत असुन ३३ पदे रिक्त आहेत, असे गृहित धरल्यास त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालील प्रमाणे राहील-

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | १३ | ७ | ३ | ३ | ३ | २ | २ | १९ | ४८ | १०० |
| २ | भरलेली पदे | १० | ५ | २ | १ | २ | १ | १ | १५ | ३० | ६७ |
| ३ | दि.३०.११.२०१८ रोजी रिक्त पदे | ३ | २ | १ | २ | १ | १ | १ | ४ | १८ | ३३ |
| ४ | दि.०१.१२.२०१८ ते दि. ३१.१२.२०१८ या कालावधीतील संभाव्य रिक्त पदे | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ | ७ |
| ५ | दि.०१.०१.२०१९ ते ३१.१२.२०१९ या कालावधीतील संभाव्य रिक्त पदे | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ५ | ८ |
| ६ | एकूण रिक्त पदे | ४ | ४ | २ | २ | १ | १ | १ | ७ | २६ | ४८ |

वरिल उदाहरणात खुल्या प्रवर्गात २६ पदे रिक्त आहेत.त्यावरून एसईबीसी वर्गाकरीता १६ टक्के आरक्षणानुसार पदे निश्चित करताना खाली दिलेल्या उदाहरणानुसार कार्यवाही करावी.

भरती वर्ष-१

(दि.१.१२.२०१८ ते दि.३१.१२.२०१९)

| खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे | एसईबीसी करिता खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|
| २६ | ४.१६<br>पुर्णांकात ४ पदे | ३ |

पहिल्या भरती वर्षात एसईबीसी करिता ४ पदे उपलब्ध होतील.

**भरती वर्ष-२**

**(दि.१.०१.२०२० ते दि.३१.१२.२०२०)**

| खुल्या प्रवर्गातील मागील वर्षातील रिक्त पदे + चालू भरती वर्षातील रिक्त पदे | एसईबीसी करिता खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | चालू भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २६ +२०= ४६ | ४६ पदांच्या १६ टक्के= ७.३६<br>पुर्णांकात ७ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील वर्षातील एसईबीसी ची कार्यरत पदे<br>७-३=४ | ३ |

**दुस-या भरती वर्षात एसईबीसी करिता ४ पदे उपलब्ध होतील.**

**भरती वर्ष-३**

**(दि.१.१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१)**

| खुल्या प्रवर्गातील मागील दोन वर्षातील रिक्त पदे + चालू भरती वर्षातील रिक्त पदे | एसईबीसी करिता खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | चालू भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २६ +२०+३२= ७८ | ७८ पदांच्या १६ टक्के= १२.४८<br>पुर्णांकात १२ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील दोन वर्षातील एसईबीसी ची कार्यरत पदे ( १ ल्या भरती वर्षातील + २ -या भरती वर्षातील कार्यरत पदे) १२-६ =६ | ६ |

**तिस-या भरती वर्षात एसईबीसी करिता ६ पदे उपलब्ध होतील.**

**भरती वर्ष-४**

**(दि.१.१.२०२२ ते दि.३१.१२.२०२२)**

| खुल्या प्रवर्गातील मागील तीन वर्षातील रिक्त पदे + चालू भरती वर्षातील रिक्त पदे | एसईबीसी करिता खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | चालू भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २६ +२०+३२+२२=१०० | १०० पदांच्या १६ टक्के= १६ | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील तीन वर्षातील एसईबीसीची कार्यरत पदे ( १ ल्या + २ -या + ३ -या भरती वर्षातील कार्यरत पदे)<br>१६-१२= ४ | |

**चौथ्या भरती वर्षात एसईबीसी करिता ४ पदे उपलब्ध होतील.**

वरिलप्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जोपर्यंत सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता (एसईबीसी) अनुज्ञेय १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत,तोपर्यंत चालू ठेवावी.

५) वरीलप्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जोपर्यंत सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी अनुज्ञेय १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत, तोपर्यंत चालू ठेवावीत. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध झाल्यानंतर मात्र प्रत्येक प्रवर्गनिहाय अनुज्ञेय टक्केवारीनुसार त्या-त्या प्रवर्गाची पदे भरण्यात यावीत.

६) पद भरती केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक ६ पासून नोंद प्रारंभ करून यानुसार त्यापुढे सदर वर्गासाठीच्या बिंदुंवर नोंद करावी.

७) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्या असलेली संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोट्यातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुंची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

८) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी, त्यांच्या अधिनस्त सर्व आस्थापनांना वरील विविध संवर्गाच्या बाबतीत यानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सुचना द्याव्यात. प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

९) सध्या आरक्षणासंदर्भात अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

************

**सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८ /१६-ब**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
**दिनांक : १९ डिसेंबर, २०१८.**

वाचा:-

१. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८.
२. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती , विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८ /१६-ब, दि.५.१२.२०१८

शासन शुध्दीपत्रक:-

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ अनुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी मंजूर संवर्ग संख्येच्या सरळसेवेच्या कोट्यातील भरण्यात येणारी १६ टक्के आरक्षणाची पदे दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ रोजी भरावयाची पदे व त्यानंतर मंजूर पदसंख्येच्या सरळसेवेच्या कोटयातील संभाव्य भरावयाची पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षांकरिता सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) या वर्गाकरीता आरक्षणाची गणना करतांना , संदर्भाधिन क्र. ४ येथील शासन निर्णय दि.५.१२.२०१८ सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब व परिशिष्ट क** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा,असे निर्देशित केले आहे.

२. उक्त अधिनियमाची अंमलबजावणीसाठी स्पष्टता आणण्याकरिता उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ४ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयामधील **परिशिष्ट क** निरसित करण्यात येत असून त्याऐवजी **परिशिष्ट क** यासोबत जोडल्या प्रमाणे वाचण्यात यावे.

३. भरती प्रक्रिया राबवितांना सुधारित **परिशिष्ट क** प्रमाणे कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन शुध्दीपत्रक राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था , शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्त्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना सदर शुध्दीपत्रक तातडीने निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

५. सदरहू शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८१२१९१७३२५४७००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHIVAJI
RAGHUNATH
DAUND

Digitally signed by SHIVAJI RAGHUNATH DAUND
DN: c=IN, o=Personal,
2.5.4.20=cace7d2ea64c6e6543e03a796e1b05a4c28b727e17119e6a62359e3a9136b4be, postalCode=400603,
st=MAHARASHTRA,
serialNumber=e08a9964fa88914fd0b0956696e822b221982cc926ec215f4b3ac3db9582d97e, cn=SHIVAJI RAGHUNATH DAUND
Date: 2018.12.19 17:41:23 +05'30'

**( शिवाजी दौंड )**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
६. मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
७. सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
८. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
११. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,

१९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०. सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१. सचिव,राज्य माहिती आयोग,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६. संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९. संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३४. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३५. सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३७. सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३८. निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

## परिशिष्ट-क

उदा. एखाद्या संवर्गात सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्या १५० आहे. दि.३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत या संवर्गात ९७ पदे कार्यरत असुन ५३ पदे भरण्यासाठी उपलब्ध आहेत, असे गृहित धरल्यास त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालील प्रमाणे राहील-

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला/ अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | २० | ११ | ४ | ४ | ५ | ३ | ३ | २८ | ७२ | १५० |
| २ | भरलेली पदे | १० | ६ | २ | ३ | ३ | २ | १ | १५ | ५५ | ९७ |
| ३ | दि.३०.११.२०१८ रोजी **भरावयाची** पदे | १० | ५ | २ | १ | २ | १ | २ | १३ | १७ | ५३ |
| ४ | दि.०१.१२.२०१८ ते दि. ३१.१२.२०१९ या कालावधीतील संभाव्य **भरावयाची** पदे | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ | १० | १० | २९ |
| ५ | एकूण **भरावयाची** पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | २७ | ८२ |

**वरिल उदाहरणात एकूण ८२ पदे भरण्यासाठी उपलब्ध आहेत.त्यावरून एसईबीसी वर्गाकरीता १६ टक्के**

| पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाची पदे | एसईबीसी करिता पहिल्या भर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|
| ८२ | १३.१२<br>पुर्णांकात १३ पदे | १३ |

**आरक्षणानुसार पदे निश्चित करताना खाली दिलेल्या उदाहरणानुसार कार्यवाही करावी.**

**भरती वर्ष-१**

**(दि.१.१२.२०१८ ते दि.३१.१२.२०१९)**

**पहिल्या भरती वर्षात एसईबीसी करिता १३ पदे उपलब्ध होतील**

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | **एसईबीसी** १६% | अराखीव ३२% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण **भरावयाची** पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | १३ | १४ | ८२ |

**भरती वर्ष-२**

**(दि.१.०१.२०२० ते दि.३१.१२.२०२०)**

**दुस-या भरती वर्षात भरण्यासाठी ४५ पदे उपलब्ध असल्यास एसईबीसी वर्गाच्या आरक्षणाची गणना खालीलप्रममाणे करावी-**

| पहिल्या भरती वर्षातील एकूण भरती केलेली पदे + दुस-या भरती वर्षातील भरावयाची पदे | एसईबीसी करिता एकूण भरती करावयाच्या पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | दुस-या भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ८२+४५=१२७ | १२७ रिक्त पदांच्या १६ टक्के= २०.३२<br>पुर्णांकात २० पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - पहिल्या भरती वर्षात भरलेली व कार्यरत एसईबीसीची पदे<br>२०-१३=७ | ७ |

**दुस-या भरती वर्षात एसईबीसी करिता ७ पदे उपलब्ध होतील.**

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | **एसईबीसी** १६% | अराखीव ३२% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिल्या भरती वर्षात भरलेली पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | १३ | १४ | ८२ |
| २ | दुस-या भरती वर्षात भरावयाची पदे | १० | ५ | १ | ० | १ | ० | २ | १५ | ७ | ४ | ४५ |
| ३ | एकूण | २५ | १२ | ४ | १ | ३ | १ | ५ | ३८ | २० | १८ | १२७ |

भरती वर्ष-३

(दि.१.१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१)

**तिस-या भरती वर्षात भरण्यासाठी २३ पदे उपलब्ध असल्यास एसईबीसी वर्गाच्या आरक्षणाची गणना खालीलप्रममाणे करावी-**

| पहिल्या व दुस-या भरती वर्षातील एकूण भरती करावयाची पदे + तिस-या भरती वर्षातील रिक्त पदे | एसईबीसी करिता एकूण भरती करावयाच्या पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | तिस-या भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ८२+४५+२३=१५० | १५० पदांच्या १६ टक्के= २४ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील दोन वर्षातील एसईबीसी ची कार्यरत पदे ( १ ल्या भरती वर्षातील + २ -या भरती वर्षातील कार्यरत पदे) २४-२० =४ | ४ |

तिस-या भरती वर्षाअखेर एसईबीसी करिता २४ पदे उपलब्ध होतील.

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | **एसईबीसी** १६% | अराखीव ३२% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिल्या भरती वर्षात भरलेली पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | १३ | १४ | ८२ |
| २ | दुस-या भरती वर्षात भरलेली पदे | १० | ५ | १ | ० | १ | ० | २ | १५ | ७ | ४ | ४५ |
| ३ | तिस-या भरती वर्षात भरावयाची पदे | २ | २ | १ | १ | ० | ० | १ | २ | ४ | १० | २३ |
| ३ | एकूण | २७ | १४ | ५ | २ | ३ | १ | ६ | ४० | २४ | २८ | १५० |

वरिलप्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जोपर्यंत सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता (एसईबीसी) सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८, महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ च्या कलम ४(१) (ख) अनुसार संवर्गातील मंजूर पदसंख्येच्या

**सरळसेवेच्या कोट्याच्या १६ टक्के आरक्षणानुसार पुर्ण आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत,तोपर्यंत चालू ठेवावी. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी १६ टक्के आरक्षणानुसार पुर्ण आरक्षित पदे उपलब्ध झाल्यानंतर मात्र प्रत्येक प्रवर्गनिहाय अनुज्ञेय टक्केवारीनुसार त्या-त्या प्रवर्गाची पदे भरण्यात यावीत.**

१) वरिलप्रमाणे एसईबीसी वर्गाच्या आरक्षणाची गणना करतेवेळेस उर्वरित मागास प्रवर्गांच्या (अजा,अज,विजा-भज,विमाप्र व इमाव) आरक्षणास बाधा न आणता करावी.

२) पद भरती केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक ६ पासून नोंद प्रारंभ करून यानुसार त्यापुढे सदर वर्गासाठीच्या बिंदुंवर नोंद करावी.

३) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्या असलेली संवर्गातील मंजूर पदसंख्येच्या सरळसेवा कोटयातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोट्यातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुंची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

४) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी, त्यांच्या अधिनस्त सर्व आस्थापनांना वरील विविध संवर्गाच्या बाबतीत यानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सुचना द्याव्यात. प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

५) सध्या आरक्षणासंदर्भात अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

************

**खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: राआधो- ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - १२ फेब्रुवारी, २०१९

**प्रस्तावना:-**

संसदेने संविधानात १०३ वी घटना दुरुस्ती कायदा, २०१९ पारित केलेला आहे. त्याद्वारे भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १५ व १६ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. उक्त घटना दुरुस्तीन्वये राज्य घटनेच्या अनुच्छेद १५ मध्ये खंड (६) चा समावेश करण्यात आला आहे. या सुधारणेनुसार अनुच्छेद १५ च्या खंड (४) व (५) मध्ये नमूद वर्गाव्यतिरिक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या नागरिकांच्या प्रगतीसाठी कोणतीही विशेष तरतूद करता येईल, तसेच खंड (४) व (५) मध्ये नमूद वर्गाव्यतिरिक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये संदर्भित अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांखेरीज, अन्य शैक्षणिक संस्थांमध्ये तसेच खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये-मग त्या राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त असोत अगर अनुदान प्राप्त नसोत-प्रवेश देण्याशी संबंधित असतील तेथवर राज्य शासनास १० टक्के पर्यंत जागा आरक्षित करता येतील. अनुच्छेद १५ मधील कोणत्याही तरतूदीचा किंवा अनुच्छेद १९ च्या खंड (१) च्या उप खंड (g) किंवा अनुच्छेद २९ च्या खंड (२) चा वरीलप्रमाणे विशेष तरतूद करण्यास राज्यास प्रतिबंध होणार नाही. हे आरक्षण सध्या मागासवर्गीयांसाठी विहित असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त राहील. (स्पष्टीकरण: अनुच्छेद १५ व १६ करिता आर्थिकदृष्टया दुर्बल घटक म्हणजे राज्य शासन वेळोवेळी आर्थिक उत्पन्न आणि अन्य आर्थिक दुर्बलतेच्या आधारावर अधिसूचित करेल त्याप्रमाणे राहील).

तसेच संविधानाच्या अनुच्छेद १६ मध्ये सुधारणा करुन त्यामध्ये खंड (६) चा समावेश करुन त्याद्वारे शासकीय सेवांमध्ये अनुच्छेद १६ च्या खंड (४) मध्ये नमूद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी १०% पर्यंत आरक्षण ठेवण्यास राज्यास प्रतिबंध होणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे. संसदेने पारित केलेला घटना दुरुस्तीचा कायदा हा दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजीच्या राजपत्रान्वये अंमलात आला आहे.

सदर घटना दुरूस्तीची राज्यात अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता राज्यातही खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय /निमशासकीय सेवा व शासनाचे उपक्रम यामधील सेवेसाठी व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था वगळता शासकीय, खाजगी, अनुदानित, विना अनुदानित संस्थामध्ये प्रवेशासाठी १०% आरक्षण ठेवण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार राज्य शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय:-**

भारतीय संविधानातील अनुच्छेद १५ (४) व (५) आणि अनुच्छेद १६ (४) अन्वये आरक्षणाचा लाभ देण्यात आलेल्या प्रवर्गांव्यतिरिक्त (मागासवर्गीय) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी, शासकीय शैक्षणिक संस्था/ अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था, विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यामध्ये एकूण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १० % आरक्षण विहित करण्यात येत आहे. सदर आरक्षण राज्यघटनेच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये संदर्भीत अल्पसंख्याक संस्थाना लागू होणार नाही.

तसेच राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय आस्थापना, निमशासकीय आस्थापना, मंडळे/महामंडळे/नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरणे यांच्या आस्थापनावरील नियुक्तीसाठी सरळसेवेच्या पदांमध्ये १० % आरक्षण विहित करण्यात येत आहे.

२. **आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ खालील अटींच्या अधीन अनुज्ञेय राहील :-**

(अ) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी ज्या व्यक्तीच्या जातींचा महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (वि.जा.) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) व महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे ) आरक्षण अधिनियम,२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) यामधील प्रवर्गांमध्ये समावेश नाही त्यांच्यासाठी शासकीय शैक्षणिक संस्था/ अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यामध्ये एकूण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १०% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सदर आरक्षण राज्य घटनेच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये संदर्भीत अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाना लागू होणार नाही.

तसेच शासकीय आस्थापना, निमशासकीय आस्थापना, मंडळे/महामंडळे/नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरणे यांच्या आस्थापनेवरील सरळसेवेच्या पदांच्या सर्व संवर्गातील नियुक्तीसाठी १०% पदे ही आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राखीव राहतील.

(ब) हे १०% आरक्षण राज्यात सध्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (वि.जा.), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) अन्वये विहित करण्यात आलेल्या मागासवर्गांसाठी व महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा

पदांचे) आरक्षण अधिनियम,२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास घटकांसाठी विहित करण्यात आलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त राहील.

(क) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आरक्षणाच्या लाभासाठी पात्रता:-

(१) ज्या अर्जदाराच्या/ उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखाच्या आत असेल त्या अर्जदारास/ उमेदवारास आर्थिकदृष्टया दुर्बल समजण्यात येईल व या आरक्षणाच्या लाभासाठी तो पात्र राहील.

(२) या आरक्षणाच्या लाभासाठी कुटुंब म्हणजे अर्जदाराचे/ उमेदवाराचे आई -वडील व १८ वर्षा खालील भावंडे तसेच अर्जदाराची/ उमेदवाराची १८ वर्षाखालील मुले व पती/पत्नी यांचा समावेश होईल. कुटुंबाच्या एकत्रित उत्पन्नात त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या सर्व स्त्रोतांमधून मिळणा-या उत्पन्नाचा समावेश असेल म्हणजेच वेतन, कृषी उत्पन्न, उदयोग-व्यवसाय या व इतर सर्व मार्गातून होणारे, अर्ज दाखल करण्याच्या दिनांकाच्या मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न एकत्रितपणे रु. ८ लाखापेक्षा कमी असावे.

(३) आर्थिक दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी या सोबत विहित करण्यात आलेल्या नमुन्यात (परिशिष्ट-अ) सक्षम प्राधिका-याचे पात्रता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच यासाठी सादर करावयाच्या अर्जाचा नमुना (परिशिष्ट-ब), अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे / पुरावा (परिशिष्ट-क) आणि घोषणापत्र (परिशिष्ट-ड) सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्याप्रमाणे असणे आवश्यक राहील.

(४) या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि. १३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक राहील.

(५) सदर प्रवर्गातील उमेदवारांना वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती ह्या इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

**(ड) पात्रता प्रमाणपत्रासंबंधातील कार्यपद्धती -**

(१) आर्थिक दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र देण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून तहसिलदार यांना घोषित करण्यात येत आहे आणि आवश्यकता असल्यास जिल्हाधिकारी यांना एकाहून जास्त तहसिलदारांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्याचे अधिकार राहतील.

(२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी आवश्यक पात्रता प्रमाणपत्र मिळण्यासाठी लाभधारकाकडून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांकापासून एका महिन्यात (३० दिवसांच्या आत) लाभधारकास पात्रता प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. ते देण्यास नकार दिल्यास अथवा चुकीचे दिल्यास त्या विरुध्द अपिल दाखल करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

(i) सक्षम प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द अपिलिय अधिकारी म्हणून त्यांच्या कार्यक्षेत्राचे उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला उपजिल्हाधिकारी पदापेक्षा कमी दर्जाचा नाही असा अधिकारी हे राहतील.

(ii) वर (i) मध्ये नमूद केलेल्या अपिलिय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द अपिलिय अधिकारी म्हणून त्यांच्या कार्यक्षेत्राचे जिल्हाधिकारी हे राहतील.

(iii) वरील अपिलिय अधिकारी यांना अपिल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्यात (३० दिवसांच्या आत) निर्णय देणे बंधनकारक राहील.

**(इ) या आरक्षणा अंतर्गत आरक्षित बिंदु व आरक्षणाचा लाभ लागू होण्याचा दिनांक :-**

१) या आरक्षणा अंतर्गत समाविष्ट होणा-या वर्गाकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. २९.०३.१९९७ व दि. ५.१२.२०१८ अन्वये निश्चित केलेल्या १०० बिंदु नामावलीतील बिंदु क्रमांक ८,१६,२६,३८,४६,५६,६८,७६,८६,९८ आरक्षित राहतील.

२) (अ) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठीचे १०% आरक्षण राज्यात अंमलात येण्याचा दिनांक ०१.०२.२०१९ हा राहील.

(ब) तसेच १०३ व्या घटनादुरुस्ती अन्वये करण्यात आलेला कायदा दिनांक १४ जानेवारी, २०१९ पासून अंमलात आलेला असल्याने दिनांक १४ जानेवारी, २०१९ ते ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत ज्या जाहिरातींमध्ये व प्रवेश प्रक्रियेत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी १० टक्के आरक्षणानुसार पदांचा समावेश केला असेल अशा पदांनासुध्दा हे आरक्षण लागू राहील.

३) ज्या उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापूर्वी नियुक्तीसाठी अर्ज केलेले असतील त्यांच्यापैकी तसेच वरील (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्या कालावधीत व त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे पदांचा समावेश केलेला असेल त्या जाहिरातींनुसार / प्रवेश प्रक्रियेत नियुक्तीसाठी अर्ज केलेले असतील अशांपैकी जे उमेदवार परिच्छेद २ मध्ये नमूद अधिनियमांमधील मागासप्रवर्गांध्ये समाविष्ट नाहीत अशा उमेदवारांना ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधून नियुक्तीसाठी इच्छुक आहेत किंवा कसे याबाबत विकल्प देण्याचा पर्याय उपलब्ध राहील.

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठीचे पात्रता प्रमाणपत्र या आदेशाच्या दिनांकापासून किंवा अर्ज सादर करण्याच्या दिनांकापासून ६ महिने यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

५) ज्या घटकांना सेवेमध्ये समांतर आरक्षण लागू आहे त्या घटकांना आर्थिकदृष्टया दुर्बल या सामाजिक प्रवर्गामध्ये देखील सेवेत समांतर आरक्षण लागू राहील.

४. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय व इतर संबंधित विभागांनी तात्काळ निर्गमित करावेत.

५.    हा शासन निर्णय शासकीय/ निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका / महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय विद्यालये, महाविद्यालये, शासकीय शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, अनुदानित/विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था आणि ज्यांना आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२१२१४१५०२१४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHIVAJI
RAGHUNATH
DAUND

Digitally signed by SHIVAJI RAGHUNATH DAUND
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=b99a2e19d25d8a33bf92aacc08f1abf37c100141f30d445bb4f9eaf5acb6e718, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=e08a9964fa88914fd0b0956696e822b221982cc926ec215f4b3ac3db9582d97e, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHIVAJI RAGHUNATH DAUND
Date: 2019.02.12 14:17:38 +05'30'

**( शिवाजी दौंड )**
सचिव (साविस), महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२) मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४) मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई. (५ प्रती)
त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन निर्णय प्रसिध्द करण्यात यावा.
११) प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२) प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३) प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४) प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८) उप सचिव (आस्थापना शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२०) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२१) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

२२) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२३) सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४) सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७) विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२८) सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०) निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२/०२/२०१९ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट- अ

# महाराष्ट्र शासन

प्रमाणपत्र क्र.

**फोटो**

## आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी विहित केलेल्या १०% आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ----------------------- श्री/श्रीमती------------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी गाव/शहर------------तालुका ------------ जिल्हा/विभाग -------------- महाराष्ट्र चे रहिवासी आहेत. तो/ती ------------ जातीचे असून जात /पोटजात/ वर्ग चे असून त्याचा समावेश महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधीसूचित जमाती (वि.जा.), भटक्या जमाती (भ.ज.), विशेष मागास प्रवर्ग (वि.मा.प्र) आणि इतर मागास प्रवर्ग (इ.मा.व) यांच्या साठी आरक्षण अधिनियम -२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम ८) आणि महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम,२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गांतर्गत होत नाही.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये त्याच्या/तिच्या कुटूंबाचे सर्व स्रोतांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ------------------/- असून, सदर उत्पन्न रु.८,००,०००/- पेक्षा कमी आहे. त्यामुळे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, तो/ ती यांचा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकामध्ये समावेश होतो.

ठिकाण :

दिनांक:

स्वाक्षरी :

नाव :

पदनाम :

हे प्रमाणपत्र अर्जकर्त्याने सादर केलेल्या खालील कागदपत्र/पुरावे यांच्या आधारावर निर्गमित करण्यात येत आहे.

१.
२.
३.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२/०२/२०१९ सोबतचे सहपत्र

Annexure-A

# Government of Maharashtra

Certificate No :

Photo

## Eligibility certificate for Economically Weaker Section

(For the purpose of 10% reservation prescribed for Economically Weaker Section vide Government Resolution सामान्य प्रशासन विभाग, क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ -अ dated, 12 February, 2019)

This is to certify that Shri/Smt/Kum -------------------------------------- is son /daughter/ward of ----------------------------- --------------He/She is resident of village / city -----------------Taluka --------------- District -------- and he /she belongs to ----------------caste/sub caste /class which is not included in the cadres mentioned in the Maharashtra State Public services, Schedule Caste, Schedule Tribes, De-notified Tribes (Vimukta Jati), Nomadic Tribes, Special Backward category and Other Backward Classes Act, 2001 (Maharashtra Act No 8 of 2004) and the Maharashtra State Reservation (of seats for admission in educational institutions in the State and for appointments in the public services and posts under the State) for Socially and Educationally Backward Classes (SEBC) Act, 2018.

As per norms prescribed Vide Government of Maharashtra, General Administration Department, and Government Resolution No. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ -अ, dated 12 February, 2019. His /Her gross family annual income from all source is Rs.---------------/- which is less than Rs.8,00,000/-. Therefore it is certified that he/ she is within category of Economically Weaker Sections.

Place :

Date :

Signature :

Name :

Designation:

(This certificate has been issued on the basis of following proof/evidences/documents)

1.
2.
3.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दि. १२/०२/२०१९ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट- ब

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शासकीय सेवेत तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये विहित केलेल्या १० % आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,

श्री. --------------

----------------

----------------

**फोटो**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नाव | |
| २ | अर्जदाराचा पूर्ण पत्ता (फोन नंबर सहीत)<br>(१) तात्पुरता /निवासी पत्ता<br>(२) कायमचा (स्वग्राम) पत्ता | |
| ३ | अर्जदाराची जात / पोटजात | |
| ४ | प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचा उद्देश | |
| ५ | अर्जदाराचा निवासी पत्ता | |
| ६ | अर्जदाराचा व्यवसाय | |
| ७ | अर्जदाराची शेती असल्यास त्याचे ठिकाण, सर्व्हे क्रमांक व पत्ता | |
| ८ | अर्जदाराच्या वडीलांचे नाव | |
| ९ | अर्जदाराच्या वडीलांची जात व पोटजात | |
| १० | वडीलांचे मूळ गाव व व्यवसाय | |
| ११ | वडीलांची शेती असल्यास त्याच सर्व्हे क्रमांक व पत्ता | |
| १२ | अर्जदाराच्या आईचे नाव | |
| १३ | अर्जदाराच्या आईचा व्यवसाय | |
| १४ | आईच्या नावे शेती असल्यास त्याचा सर्व्हे क्रमांक, गांव व पत्ता | |
| १५ | अर्जदाराच्या पत्नी / पतीचे नाव | |
| १६ | अर्जदाराच्या पत्नी / पती यांचा व्यवसाय तथा शेतीचे ठिकाण, पत्ता | |
| १७ | अर्जदाराचा १८ वर्षाखालील भाऊ / बहिण यांची नाव | |
| १८ | अर्जदाराचा भाऊ / बहिण यांच्या नावे व्यवसाय वा शेती असल्यास त्याची संपूर्ण माहिती | |
| १९ | अर्जदाराच्या १८ वर्षांखालील मुलांची नावे | |
| २० | अर्जदाराच्या मुलांचा व्यवसाय अथवा शेतीपासूनचे उत्पन्न व शेती ठिकाणचा पत्ता | |
| २१ | अर्जदार महाराष्ट्रा बाहेरून राज्यात आला असल्यास त्याचा राज्यातील वास्तव्याचा कालावधी (वर्ष व दिनांकासह) | |

| | | |
|---|---|---|
| २२ | अर्जदाराच्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे (भाऊ, बहीण, पती, पत्नी, मुले यांचे एकूण उत्पन्न स्रोताच्या माहितीसह) | |
| २३ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी जोडलेले पुरावे | |

मी असे घोषित करतो की, मी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा इतर मागास प्रवर्ग या घटकांमध्ये माझा समावेश होत नाही. तसेच मी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातही समाविष्ट होत नाही. या घोषणापत्राद्वारे मी असेही घोषित करतो की, मी वर नमूद केलेली माझी माहिती पूर्णपणे सत्य असल्याने मी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये समाविष्ट होण्यास पात्र आहे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मी अर्ज दाखल केला आहे. मला पूर्णपणे ज्ञात आहे की, मी दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझा अर्ज रद्द होऊ शकतो व मला सेवेतून काढण्यात येऊन माझ्याविरूद्ध प्रचलित नियमानुसार फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो. माझ्याकडून कोणतीही सत्य माहिती लपविण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास सक्षम प्राधिकारी मला कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा नोटीस न देता सेवेतून काढू शकतात किंवा माझा शैक्षणिक संस्थेमधील प्रवेश रद्द करू शकतात व अशा स्वरूपाच्या कारवाईस मी वैयक्तिकरित्या पूर्णपणे जबाबदार राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

अर्जदाराची स्वाक्षरी
(अर्जदार अज्ञान असल्यास त्याचे आई / वडील/
पालक यांची स्वाक्षरी)

दिनांक:

-------------------

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दि. १२/०२/२०१९ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट- क

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शासकीय सेवेत तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये विहित केलेल्या १० % आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर करावयाच्या अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे / पुरावा

---

**अ) ओळखीचा पुरावा (खालीलपैकी कोणताही एक)**

१) मतदार ओळखपत्र
२) आधार कार्ड
३) पारपत्र
४) वाहन चालन अनुज्ञप्ती
५) शासकीय निमशासकीय ओळखपत्र
६) पॅन कार्ड
७) मरा रोहयो जॉब कार्ड

**आ) पत्त्यासाठी पुरावा (खालीलपैकी कोणताही एक)**

१) मतदार यादीचा पुरावा
२) पाणीपट्टी, घरपट्टी पावती
३) ७/१२ आणि ८-अ चा उतारा
४) वीज देयक
५) दुरध्वनी देयक
६) पारपत्र
७) आधारकार्ड

**इ)** बाहेरील राज्यातून स्थलांतरित होऊन राज्यात स्थायिक झालेल्या व्यक्तींसाठी सादर करावयाचे पुरावे **(खालीलपैकी कोणतेही दोन)**

१) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
२) वीज देयक
३) भाडे करार / भाडे पावती
४) दुरध्वनी देयक
५) वाहन चालन अनुज्ञप्ती
६) शासकीय कर भरणा केलेला अथवा नगरपालिका, महानगरपालिका ग्रामपंचायत यांच्याकडे कोणतीही फी अथवा कर भरणा केलेली पावती

ई) वयाचा पुरावा -

जन्मदाखला किंवा जन्मतारीख असलेले शालान्त परीक्षा प्रमाणपत्र यापैकी एक. ते नसल्यास खालीलपैकी एक

१) प्राथमिक शाळेचा प्रवेशाचा उतारा
२) बोनाफाईड प्रमाणपत्र

३) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र

उ) उत्पन्नाचा पुरावा (खालीलपैकी जे लागू असतील ते सर्व)

१) कुटुंबातील ज्या व्यक्ती शासकीय अथवा खाजगी नोकरीत असल्यास त्यांचे वेतनाचे फॉर्म १६

२) व्यवसाय धंदा असल्यास वार्षिक आयकर, वस्तू व सेवाकर भरल्याचे पुरावे

३) अर्जदार अथवा कुटुंबातील सदस्य जमीनमालक असल्यास त्यांचे ७/१२, ८-अ चा उतारा व तलाठी अहवाल

४) कुटुंबातील सदस्य सेवानिवृत्त असल्यास त्यांचे बँकेकडील प्रमाणपत्र, आयकर विवरणपत्र

५) अन्य मार्गातून (गुंतवणूक, लाभांश इ. मार्गांनी) उत्पन्न असल्यास त्याची विगतवारी पुराव्यासह

टीप - वरील पुराव्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शंका असल्यास त्याच्या पडताळणीसाठी आवश्यक बाबींची पूर्तता करणेबाबत विचारणा करू शकेल.

-----------------

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दि.१२/०२/२०१९ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट- ड

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी घोषणापत्र

मी ------------------------ वय ------- जात व पोटजात ------- व्यवसाय ------- पत्ता ------- खाली स्वाक्षरी करणार शपथेवर घोषित करतो की, मी /माझी पत्नी/पती/ माझा मुलगा / मुलगी / पाल्य नावे ------------------ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. आमच्या सर्वांचे कुटुंबातील सर्व स्त्रोतातून मागील आर्थिक वर्षात झालेली मिळकत खालील प्रमाणे घोषित करीत आहे. ती शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेत येत असल्याने मी सदर गटात मोडतो.

| अ.क्र. | उत्पन्नाचा मार्ग | आर्थिक वर्ष | उत्पन्न |
|---|---|---|---|
| १ | वेतन/मजुरी पासूनचे उत्पन्न | | |
| २ | व्यवसाय उद्योगापासूनचे उत्पन्न | | |
| ३ | कृषी उत्पन्न | | |
| ४ | गुंतवणुकीच्या स्त्रोत्रातून प्राप्ती | | |
| ५ | वरील स्त्रोता व्यतिरिक्तचे उत्पन्न | | |
| | **एकूण उत्पन्न** | | |

मी असे घोषित करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे पूर्णपणे सत्य आहे आणि मी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकामध्ये मोडतो आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे लाभ घेण्यासाठी मी पात्र आहे.

ठिकाण :

अर्जदाराची स्वाक्षरी
(अर्जदार अज्ञान असल्यास त्याचे आई / वडील/
पालक यांची स्वाक्षरी)

दिनांक:

----------------

**मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.२७ जून,२०१९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाच्या आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक बीसीसी- २०१८/प्र.क्र. ५८१ ए /१६-ब**

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**दिनांक : ४ जुलै, २०१९.**

वाचा:-

१. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८.
२. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती , विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८ /१६-ब, दि. ५.१२.२०१८ व शासन शुध्दीपत्रक दि. १९.१२.२०१८.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२.०२.२०१९.
६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१९/प्र.क्र.११८ए/२०१९/१६-ब, दि. १६.२.२०१९ व शासन शुध्दीपत्रक दि. १८.२.२०१९
७. मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दि.२७ जुन,२०१९ रोजी जनहित याचिका क्र १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिलेला निर्णय
८. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण (सुधारणा ) अधिनियम २०१९ (सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.७) दि.३ जुलै,२०१९

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ **(सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२)** यामध्ये महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गाच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदांच्या आरक्षणासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतूद आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) नुसार कोणत्याही न्यायालयाचा किंवा इतर प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि उक्त अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळसेवा प्रवेशाच्या एकूण नियुक्त्यांच्या १६% (सोळा टक्के) इतक्या जागा ह्या, मराठा समाजासह सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी स्वतंत्रपणे राखून ठेवण्यात येतील.

जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ आणि इतर संबंधित प्रकरणे यांमध्ये, उक्त अधिनियमाच्या विधिग्राह्यतेला मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २७ जून २०१९ रोजी उक्त प्रकरणांतील न्यायनिर्णय दिला आहे, त्याद्वारे उक्त अधिनियमाच्या उक्त तरतूदींद्वारे विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या प्रमाणाची मर्यादा वगळून उक्त अधिनियमाची विधिग्राह्यता कायम ठेवण्यात आली आहे.

उक्त अधिनियमाच्या उक्त तरतूदींद्वारे विहित करण्यात आलेली उपरोक्त आरक्षणाच्या प्रमाणाची बाजू विचारात घेणारा उक्त न्यायनिर्णय, राज्य शासनाने, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १५(४), अनुच्छेद १५(५) आणि अनुच्छेद १६(४) अन्वये, त्यास समर्थकारी करण्याचा अधिकारांचा वापर करुन केलेली, दोन्ही १६% (सोळा टक्के) इतकी मर्यादा निश्चित करणे कायदेशीरदृष्ट्या समर्थनीय नाही, असा निर्णय देतो. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाद्वारे निश्चित करण्यात आलेले प्रमाण/ मर्यादा ही परिमाण ठरविण्यायोग्य आधारसामग्रीवर आधारित आहे, असे मत त्यात व्यक्त केले आहे. आयोगाने उक्त प्रमाण/ मर्यादा अनुक्रमे १२% (बारा टक्के) आणि १३% (तेरा टक्के) इतकी निश्चित केली आहे. उक्त न्यायनिर्णयात असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, उक्त तरतुदींद्वारे अशा प्रकारे तरतूद करण्यात आलेले १६% (सोळा टक्के) आरक्षणाचे प्रमाण कायदेशीररित्या समर्थनीय नाही. परिणामत: मा.उच्च न्यायालयाने अशा प्रकारे तरतूद करण्यात आलेले १६% (सोळा टक्के) आरक्षण रद्दबातल करुन, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १५(४), अनुच्छेद १५(५) अन्वये १२% (बारा टक्के) हून अधिक, तसेच भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १६(४) अन्वये १३ % (तेरा टक्के) हून अधिक आरक्षण रद्द केले आहे. त्यास अनुसरून संदर्भ क्र. ८ येथील अधिनियमान्वये सन २०१८ आरक्षण अधिनियम क्र.६२ च्या कलम ४ (१) च्या पोट कलम ख मध्ये सुधारणा करण्यात आली आहे व राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळसेवा प्रवेशाच्या एकूण नियुक्त्यांच्या १३% (तेरा टक्के) इतक्या जागा ह्या, मराठा समाजासह सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी निश्चित केल्या आहेत. त्याअनुषंगाने संदर्भाधिन क्र.४ ते ६ येथील शासन निर्णय व शासन शुद्धिपत्रकान्वये विहित

करण्यात आलेली बिंदुनामावली, एसईबीसी वर्गाच्या १३ टक्के आरक्षणासह सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर संलग्न याचिका दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दि.२७ जुन,२०१९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार तसेच संदर्भाधिन क्रं. ८ येथील अधिनियमान्वये केलेल्या सुधारणेस अनुसरुन, **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्ग (एसईबीसी.) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) वर्गासाठी, राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १३ टक्के आरक्षण विहित करण्यात येत आहे. त्यानुसार संदर्भाधिन क्र.४ ते ६ येथील शासन निर्णय व शासन शुद्धिपत्रकान्वये अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारित करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ येथील, अधिनियम प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, म्हणजेच दि. ३० नोव्हेंबर २०१८ या दिनांकापासून शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसंदर्भात सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

३. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत, वरील प्रमाणे बिंदुनामावलीचा अवलंब करताना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे

४. सदर शासन निर्णय मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.२७.६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल झाल्यास त्यामधील न्यायनिर्णयाच्या निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

६. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०७०४१७२४१७०२०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.07.04 17:35:50 +05'30'

**( टि.वा.करपते )**
**उप सचिव , महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५) मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य व संसद सदस्य,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
७) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१६) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७) प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९) सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२०) सचिव,राज्य माहिती आयोग,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८) संचालक, सेवायोजन, मुंबई,

२९) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३४) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३६) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३७) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

**परिशिष्ट – अ**

**सरळसेवा १०० बिंदूनामावली**

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ७० | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** | ७२ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ४० | खुला | ७४ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** | ४२ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ७६ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | खुला | ४४ | खुला | ७८ | खुला |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** | ८० | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| १३ | खुला | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ४८ | खुला | ८२ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** | ५० | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ८४ | खुला |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | खुला | ५२ | खुला | ८६ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | खुला | ५४ | खुला | ८८ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ५६ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** | ९० | खुला |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | खुला | ५८ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ९२ | खुला |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** | ६० | खुला | ९४ | खुला |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ६२ | खुला | ९६ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | खुला | ६४ | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** | ९८ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | खुला | ६६ | खुला | १०० | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | खुला | ६८ | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक** | | |

## प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

<table>
<tr><th>अक्र</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३ %</td><td colspan="2">१, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७ %</td><td colspan="2">२, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३%</td><td colspan="2">३, ४१, ८३,</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५%</td><td>४, ४७</td><td rowspan="2">९९(ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>३.५%</td><td>७, ३१, ५७,</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>२%</td><td colspan="2">११, ७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२%</td><td colspan="2">१५, ८७</td></tr>
<tr><td>८</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>१९%</td><td colspan="2">५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५</td></tr>
<tr><td>९</td><td>सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग</td><td>१३%</td><td colspan="2">६,१४,२२,२८,३६,४२,५०,५८,६४,७२,८०,८८,९६</td></tr>
<tr><td>१०</td><td>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक</td><td>१०%</td><td colspan="2">८, १६, २६, ३८, ४६, ५६, ६८, ७६, ८६, ९८</td></tr>
<tr><td>११</td><td>खुला</td><td>२५%</td><td colspan="2">१०,१३,१८,२०,२४,३०,३२,३४,४०,४४,४८,५२,५४, ६०,६२,६६,७०,७४,७८,८२,८४,९०,९२,९४,१००.</td></tr>
</table>

## परिशिष्ट – ब

## बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना.

१. सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात राज्यातील **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्ग (एसईबीसी.) करिता विहीत केलेल्या १३ टक्के आरक्षणाच्या तरतुदीस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

२. शासन शुध्दीपत्रक दि.१९.१२.२०१८ सोबत जोडलेल्या परिशिष्ट क ऐवजी सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता येणाऱ्या १३ टक्के आरक्षणानुसार येणा-या पदांची गणना खालील तक्त्यानुसार करावी.

**उदा. एखाद्या संवर्गात सरळेसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्या १५० आहे. दि.३०.११.२०१८ पर्यंत या संवर्गात ९७ पदे कार्यरत असुन ५३ पदे भरण्यासाठी उपलब्ध आहेत, असे गृहित धरल्यास त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालील प्रमाणे राहील–**

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला/ अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | २० | ११ | ४ | ४ | ५ | ३ | ३ | २८ | ७२ | १५० |
| २ | भरलेली पदे | १० | ६ | २ | ३ | ३ | २ | १ | १५ | ५५ | ९७ |
| ३ | दि.३०.११.२०१९ रोजी **भरावयाची** पदे | १० | ५ | २ | १ | २ | १ | २ | १३ | १७ | ५३ |
| ४ | दि.०१.१२.२०१८ ते दि. ३१.१२.२०१९ या कालावधीतील संभाव्य **भरावयाची** पदे | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ | १० | १० | २९ |
| ५ | एकूण **भरावयाची** पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | २७ | ८२ |

| पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाची पदे | एसईबीसी करिता पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १३ टक्केनुसार येणारी पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|
| ८२ | १०.६६<br>पुर्णांकात ११ पदे | ११ |

**वरिल उदाहरणात एकूण ८२ पदे भरण्यासाठी उपलब्ध आहेत.त्यावरून एसईबीसी वर्गाकरिता १३ टक्के आरक्षणानुसार पदे निश्चित करताना खाली दिलेल्या उदाहरणानुसार कार्यवाही करावी.**

**भरती वर्ष-१**

**(दि.१.१.२०१९ ते दि.३१.१२.२०१९)**

**पहिल्या भरती वर्षात एसईबीसी करिता ११ पदे उपलब्ध होतील**

| अ क्र | तपशील | अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | **एसईबीसी** १३% | **ईडब्ल्यूएस** १०% | अराखीव | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण **भरावयाची** पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | ११ | ८ | ८ | ८२ |

**भरती वर्ष-२**

**(दि.१.०१.२०२० ते दि.३१.१२.२०२०)**

**दुस-या भरती वर्षात भरण्यासाठी ४५ पदे उपलब्ध असल्यास एसईबीसी वर्गाच्या व ईडब्ल्यूएस करिता आरक्षणाची गणना खालीलप्रमाणे करावी-**

| पहिल्या भरती वर्षातील एकूण भरती केलेली पदे + दुस-या भरती वर्षातील भरावयाची पदे | एसईबीसी करिता एकूण भरती करावयाच्या पदांच्या १३ टक्केनुसार येणारी पदे | दुस-या भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ८२+४५=१२७ | १२७ रिक्त पदांच्या १३ टक्के= १६.५१<br>पुर्णांकात १७ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - पहिल्या भरती वर्षात भरलेली व कार्यरत एसईबीसीची पदे<br>१७-११=६ | ६ |

**दुस-या भरती वर्षात एसईबीसी करिता ६ पदे उपलब्ध होतील**

| अ क्र | तपशील | अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | **एसईबीसी** १३% | **ईडब्ल्यूएस** १०% | अराखीव | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिल्या भरती वर्षात भरलेली पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | ११ | ८ | ८ | ८२ |
| २ | दुस-या भरती वर्षात भरावयाची पदे | १० | ५ | १ | ० | १ | ० | २ | ११ | ६ | ५ | ४ | ४५ |
| ३ | एकूण | २५ | १२ | ४ | १ | ३ | १ | ५ | ३४ | १७ | १३ | १२ | १२७ |

**भरती वर्ष-३**

**(दि.१.१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१)**

**तिस-या भरती वर्षात भरण्यासाठी २३ पदे उपलब्ध असल्यास एसईबीसी वर्गाच्या व ईडब्लूएस घटकासाठी आरक्षणाची गणना खालीलप्रमाणे करावी-**

| पहिल्या व दुस-या भरती वर्षातील एकूण भरती करावयाची पदे + तिस-या भरती वर्षातील रिक्त पदे | एसईबीसी करिता एकूण भरती करावयाच्या पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | तिस-या भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ८२+४५+२३=१५० | १५० पदांच्या १३ टक्के= १९.५ पदे पुर्णांकात २० पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील दोन वर्षातील एसईबीसी ची कार्यरत पदे ( १ ल्या भरती वर्षातील + २ -या भरती वर्षातील कार्यरत पदे) २०-१७ =३ | ३ |

तिस-या भरती वर्षात एसईबीसी करिता ३ पदे उपलब्ध होतील

| अ क्र | तपशील | अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | **एसईबीसी** १३% | **ईडब्ल्यूएस** १०% | अराखीव | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिल्या भरती वर्षात भरलेली पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | ११ | ८ | ८ | ८२ |
| २ | दुस-या भरती वर्षात भरावयाची पदे | १० | ५ | १ | ० | १ | ० | २ | ११ | ६ | ५ | ४ | ४५ |
| ३ | तिस-या भरती वर्षात भरावयाची पदे | २ | २ | १ | १ | ० | ० | १ | २ | ३ | २ | ९ | २३ |
| ४ | एकूण | २७ | १४ | ५ | २ | ३ | १ | ६ | ४६ | २० | १५ | २१ | १५० |

वरिलप्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जोपर्यंत सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता (एसईबीसी) संवर्गातील मंजूर पदसंख्येच्या सरळसेवेच्या कोट्याच्या १३ टक्के आरक्षणानुसार पुर्ण आरक्षित पदे म्हणजेच २० पदे उपलब्ध होत नाहीत,तोपर्यंत चालू ठेवावी. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी १३ टक्के आरक्षणानुसार पुर्ण आरक्षित पदे उपलब्ध झाल्यानंतर मात्र प्रत्येक प्रवर्गनिहाय अनुज्ञेय टक्केवारीनुसार त्या-त्या प्रवर्गाची पदे भरण्यात यावीत.

१) वरिलप्रमाणे आरक्षणाची गणना करतेवेळेस उर्वरित मागास प्रवर्गांच्या (अजा,अज,विजा-भज,विमाप्र व इमाव) आरक्षणास बाधा न आणता करावी.

२) पद भरती केलेल्या **एसईबीसी** उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक ६पासून नोंद प्रारंभ करून यानुसार त्यापुढे सदर वर्गासाठीच्या बिंदुंवर नोंद करावी.

३) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्या संवर्गातील मंजूर पदसंख्येच्या सरळसेवा कोटयातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोट्यातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुंची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

४) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी, त्यांच्या अधिनस्त सर्व आस्थापनांना वरील विविध संवर्गाच्या बाबतीत यानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सुचना द्याव्यात. प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

५) सध्या आरक्षणासंदर्भात अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

---------------

# महाराष्ट्र शासन

क्र – बीसीसी –२०१८/प्र.क्र.६३१ A/१६-ब
सामान्य प्रशासन विभाग,
हुतात्मा राजगूरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक: ०४.०७.२०१९

प्रति,

**मा.सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव**
**सर्व मंत्रालयीन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.**

**विषय– पदभरती २०१८-२०१९.**
**संदर्भ – सामान्य प्रशासन विभागाचे समक्रमांकाचे दि.३१.१२.२०१८ व दि.२५.०२.२०१९ रोजीचे पत्र कृपया पहावे.**

**महोदय/महोदया,**

सन २०१८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र,६२ दि.३०.११.२०१८ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास (एस.ई.बी.सी.) वर्गाकरीता १६ % आरक्षण देण्यात आले आहे. त्याविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. तसेच सदर याचिकांमधील मा.उच्च न्यायालयाचे आदेश व प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याने एसईबीसी आरक्षणासह देण्यात आलेल्या जाहिरातींमधील भरती संबंधाने नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही मा.उच्च न्यायालयातील संबंधित प्रकरणातील पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येऊ नये अशा सूचना संदर्भाधीन पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

२. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.२७.०६.२०१९ रोजी अंतिम निकाल दिलेला आहे. त्यानुसार मा.न्यायालयाने राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता १६% ऐवजी १२% व राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांकरीता १६% ऐवजी १३% आरक्षण ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. सबब संबंधित सर्व विभागांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने व शासनाने आरक्षण अधिनियम २०१८ (२०१८ चा महा. ६२) मधील कलम ४ च्या पोट कलम (१) मध्ये (क) व (ख) येथे केलेल्या सुधारणा विचारात घेता, शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता १२% व राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांमध्ये १३% जागा एसईबीसी वर्गाकरीता ठेवण्याची कार्यवाही संबंधित विभागांनी तात्काळ पूर्ण करावी.

३. सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली स्वतंत्रपणे विहीत करण्यात येत आहे. प्रशासकीय विभागाने यापूर्वी १६% प्रमाणे पदभरती करण्यासाठी जाहीरात देऊन पदभरतीची प्रक्रिया सुरु केली असल्यास, आता जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर प्रकरणामधील मा. मुंबई उच्च न्यायालयाचे दि.२७.०६.२०१९ चे आदेश विचारात घेता सरळसेवा भरतीमध्ये १३% आरक्षणानुसार एसईबीसी प्रवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करुन पद भरतीची कार्यवाही त्यांच्या स्तरावर पूर्ण करावी.

४. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयांना याबाबत त्वरीत कळवावे, अशी आपणास विनंती आहे.

५.    सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०७०४१३१६०११८०७ असा आहे.

आपला विश्वासू,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.07.04 13:21:10 +05'30'

(टि. वा. करपते)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
२) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
३) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
५) सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष),महाराष्ट्र राज्य.